महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ५५ /२०२३ दि. ०६/०४/२०२३

## –:वाहतूक नियंत्रण अधिसुचना:–

**ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रांतर्गत कोळसेवाडी वाहतुक उप विभाग हद्दीतील** कल्याण पुर्व खडेगोलवली ते अमर कॉलनी चिंचपाडा दरम्यान रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम व नाल्यावरील कमकुवत ब्रिज तोडुन नवीन सिमेंट कॉंकिटीकरणाचा ब्रिज बांधण्यात येणार असल्याने सदर मार्गावरून जाणारी वाहने पर्यायी मार्गाने वळविणे गरजेचे असुन सदर भागात वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, एस. एस. बुरसे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय २, ठाणे शहर, अतिरिक्त कार्यभार, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद –** १) चिंचपाडा अमर कॉलनी येथुन होली होरायझन स्कुल समोरील असलेल्या नाल्यावरील ब्रिज वरून खडेगोलवली, विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन उल्हासनगर दिशेने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **होली होरायझन स्कुल समोर येथे प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथुन उजव्या बाजुस वळण घेवुन न्यु रायगड कॉलनी नाल्या लगत रोडने खडेगोलवली पाण्याच्या टाकी समोरील ब्रिज वरून यश मेडीकल समोरून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) खडेगोलवली, विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन उल्हासनगर, ममता मेडीकल चौक येथुन चिंचपाडा, अमर कॉलनी होली होरायझन स्कुल कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **ममता मेडीकल चौक खडेगोलवली येथे प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** खडेगोलवली गावातील रहिवासी यांनी चिंचपाडा, अमर कॉलनी दिशेने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहने ही यश मेडीकल येथुन डाव्या बाजुस वळण घेवुन नाल्यावरील ब्रिज वरून इच्छीत स्थळी जातील.

तसेच विठ्ठलवाडी, रेल्वे स्टेशन, उल्हासनगर कडुन येणारी वाहने ही यश मेडीकल, पाण्याच्या टाकी समोरील नाल्यावरील ब्रिज वरून न्यु रायगड कॉलनी समोरील नाल्यालगत असलेल्या रोड वरून अमर कॉलनी चिंचपाडा, हनुमाननगर, गॅस कंपनी मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**वेग मर्यादा –** १) खडेगोलवली, यश मेडीकल, पाण्याच्या टाकी समोरील नाल्यावरील ब्रिजवरून – न्यु रायगड कॉलनी समोरील नाल्यालगत रोड वरून जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांची वेगमर्यादा ३० कि.मी/ताशी करण्यात येत आहे.

सदरची वाहतुक अधिसुचना ही दि. ०८/०४/२०२३ पासून रस्त्याचे काम पुर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( एस. एस. बुरसे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय २, ठाणे शहर,
अतिरिक्त कार्यभार
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

CamScanner

– मा. जिल्हाधिकारी, ठाणे

– मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

– मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण

– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.

– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

– परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

– नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

– ठाणे पोलीस पत्रक

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.

२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner